पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८६७ दिनांक - १३/१२/२०२३**

युनिट-५, गुन्हे शाखा पुणे शहर

## दरोडाच्या तयारीत असलेल्या टोळीस केले जेरबंद,

दि. १२/१२/२०२३ रोजी गुन्हे शाखा, युनिट-५, कडुन युनिट कार्यक्षेत्रात युनिट-५ प्रभारी पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी यांचेसह अधिकारी व अंमलदार असे हडपसर पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना युनिट-५ कडील पथकाला बातमी मिळाली की,भोसले व्हिलेज सोसायटीचे कमानीचे पाठीमागे मोकळ्या जागेत ०५ संशईत इसम जमलेले असुन त्याचेजवळ घातक हत्यार असुन ते जवळच असलेल्या हिंदुस्थान पेट्रोलपंप वरील कॅश लुटणार आहे. अशी बातमी मिळाली.

सदर बातमीप्रमाणे बातमीच्या ठिकाणी युनिट कडील अधिकारी व अंमलदार यांनी छापा टाकला, त्यादरम्यान नमुद इसमांपैकी काही इसमांना पोलीसांची चाहुल लागल्याने अंधाराचा फायदा घेऊन पळुन गेले व ३ इसमांना ताब्यात घेतले. त्यांची नावे **१) अमन संजय दिवेकर वय २२ वर्षे रा.लेन नंबर ४,जयहिंदनगर, अप्पर इंदिरानगर,पुणे २)विशाल संजय लोखंडे वय २४ वर्षे रा. कांबळे वस्ती,अप्पर इंदिरानगर, पुणे** व ३) विधीसंघर्षीत बालक असे असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांची अंगझडती घेता त्यांचे ताब्यातुन एकुण ६५,९४०/- रुपये कि.चा मुद्देमाल त्यामध्ये दोन कोयते, लाल मिरची पावडर, नायलॉनची दोरी असे घातक शस्त्रे व साधने जप्त करण्यात आलेली आहे. त्याचेकडे सदरबाबत विचारणा करता, वर नमुद तीन इसम व पळुन गेलेले त्यांचे इतर ३ साथीदारासह विठ्ठल पेट्रोलपंपावर दिवसभरात गोळा झालेली कॅश कॅशीयर रुममध्ये जमा झालेली कॅश आम्ही पाच जण मिळुन कॅशीयरला कोयत्याचा धाक दाखवुन ती कॅश लुटण्याकरीता जाणार होतो, वगैरे सांगितले. तसेच त्यांचेकडे केलेल्या सखोल तपासात व त्यांचे ताब्यात मिळालेल्या दोन मोबाईल फोन हे कोंढवा पोलीस स्टेशनचे हद्दीत रात्रीचे वेळी इसमांना कोयत्याचा धाक दाखवुन जबरदस्तीने चोरी केल्याचे व त्यांनी हडपसर पोलीस ठाणे हद्दीत एका इसमाची जबरदस्तीने कॅश लुटली असल्याचे निष्पन्न झाले. म्हणुन त्यांचेविरुध्द **हडपसर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं.१८९२/२०२३,भा.दं.वि. कलम ३९९,४०२ व भा.ह.का.कलम ४(२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३),१३५** प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन अधिक तपास पोलीस करीत आहे.

**नमुद आरोपीतांकडुन कोयत्याचा धाक दाखवुन जबरी चोरी केलेले कोंढवा,हडपसर वानवडी स्वारगेट ,बिबवेवाडी भारती विद्यापीठ या पोलीस स्टेशनकडील एकुण १८ गुन्हे उघडकीस आले आहे.**

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त (अतिरिक्त कार्यभार) व मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप आयुक्त, श्री. अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त, श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी, सहायक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, पोलीस उप निरीक्षक अविनाश लोहोटे, पोलीस अमंलदार, रमेश साबळे, राजस शेख, आश्रुबा मोराळे, प्रताप गायकवाड, शहाजी काळे, दया शेगर, प्रमोद टिळेकर, चेतन चव्हाण, विनोद शिवले, पृथ्वीराज पांडुळे, दाऊद सय्यद, अकबर शेख, अमित कांबळे, पांडुरंग कांबळे, विलास खंदारे, राहुल ढमढेरे, शशिकांत नाळे, पल्लवी मोरे, स्वाती गावडे व संजयकुमार दळवी यांनी केलेली आहे.